Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# मराठवाड्यातील बोली व स्त्रीयाच्या बोली भाषेचे स्वरुप विशेष

**प्रा.डॉ.श्रीहरी रामराव धोंड**
मराठी विभाग, राष्ट्रमाता इंदिरा गांधी
महाविद्यालय, जालना

**प्रस्तावना** – मराठवाड्याच्या मराठी भाषेची जडण घडण मराठवाडी बोलीने झालेली आहे. कारण मराठीतील पहिले वाङमय येथेच निर्माण झाले. मुकुंदराज ज्ञानेश्वर, संत एकनाथ आणि महानुभावीय लेखक कवी येथीलच होत. खरे तर मराठी भाषेची मंगोत्री मराठवाडी बोलीच म्हणावी लागेल. मुकुंदराज ज्ञानेश्वर, संत एकनाथ यांचे वाङमय पाहिले तर त्यातील प्रौढ-प्रगल्भ भाषा पाहून आश्चर्य वाटते. कोणतीही भाषा प्रथम एवढी प्रगल्भ असत नाही. कारण तिचे अस्तित्व या पूर्वीही अले पाहिजे. तिच्या अस्तित्वाच्या खुणा बोलीत आढळून येतात. इराकत, रेंधी, खळ, फल हे वेदपूर्वकालीन वैदिक भाषेतील शब्द आजही मराठवाडी बोलीत दिसून येतात. तेव्हा अशा प्रकारे तिचे प्राचीनत्व लक्षात येऊ शकते. मराठवाड्यातील लोकसाहित्य मराठवाडी बोलीतच आहे. तेव्हा बोली भाषा प्रमाणभाषा, ग्रांथीक भाषेपेक्षा प्राचीन असाव्यात असा संशोधकांचा तर्क आहे. आणि तो खरा म्हणावा लागेल.

भौगोलिकदृष्ट्या विचार केला तर उस्मानाबाद, औरंगाबाद, जालना, नांदेड, परभणी, लातूर आणि हिंगोली या आठ जिल्ह्यांचा हा भूभाग आहे. यात बोलली जाणारी ही मराठवाडी बोली आहे. हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली आणि कळमनुरी हे तालुके व नांदेड जिल्ह्यातील हदगाव हा तालुका विदर्भाला जवळ आहे. तेव्हा या भागातील बोलींचा परस्परांवर परिणाम होणे स्वाभाविक आहे. विशिष्ट हेल काढून बोलण्याच्या पध्दतीत साम्य आढळून येते. नांदेड जिल्ह्यातील देगलूर आणि धर्माबाद हे तालुके आंध्रप्रदेशाला जवळ आहेत. त्यामुळे त्या भागातील बोलीवर तेलगु भाषेतील उच्चारांचा परिणाम जाणवतो. तसेच लातूर जिल्ह्यातील उदगीर आणि उमरगा हे तालुके कर्नाटकला जवळ आहेत त्यामुळे त्या भागावातील उच्चावरांवर कन्नड भाषेचा परिणाम आढळून येतो. असे असले तरीही ती मराठी आहे. आणि

मराठवाडी बोलीही आहे. तिचे स्वतःचे वेगळे स्वरुप आहे, तिची वेगळी ओळख आहे. आणि वेगळे वैशिष्ट्ये आहेत ही ओळख मिटत चालली आहे. काही बाबतीत लोक बदलत आहे. म्हणून तिची जपणूक केली पाहिजे. मोटारीची धूळ आणि रेल्वेचे रुळ जेथे जेथे पोहोचले नाहीत त्या भूभागात मराठवाडी बोली सुरक्षित आहे. अभ्यासक- संशोधक तेथे पोहोचले पाहिजे या दृष्टीने लोकसाहित्याचा अभ्यासही झाला पाहिजे. त्यासाठी लोकसाहित्याचा संग्रह करुन प्रकाशित केले पाहिजेत. कारण हे सर्व लोकसाहित्य मराठवाड्याच्या बोलीभाषेत आहेत.

हैद्राबाद संस्थानातील मराठवाडा हा एक भूभाग यात मराठी भाषिक लोक रहातात मराठवाडा भाषैतिहासिकदृष्ट्या नावास सार्थ आहे. मराठवाड्यातील भाषा म्हणून मराठवाडी ही जनसामान्याची भाषा आहे ही बोली जनमानसामान्यांअना कळावी, समजावी म्हणून येथील प्राचीन लेखक, कवींनी याबोलीतच ग्रंथ रचना केली. या बोलीतील उच्चार, शब्द, व्याकरण, वाक्यप्रचार, म्हणी, शब्दसंग्रह या सर्वांमधून वेगळेपणा जाणवतो. बारा कोसावर भाषा बदलते म्हणतात ते खरे आहे. भाषा मराठीच असली तरी प्रादेशिकता, स्थानिक प्रवृत्ती, धर्म-जात-संस्कृती उद्योग व्यवसाय आणि सत्ता यांच्यामुळे उच्चारात बदल होतात. सत्ताधाऱ्यांची भाषा हे ही एक प्रमुख कारण आहे. तरही मराठवाडा बोली हे एक वास्तव आहे. ही बोली अस्थिर आहे. परिवर्तनशीलही आहे. येथील जिल्ह्या-जिल्ह्यातील बोलीतही फरक आढळून येतो. वेगळेपणा जाणवतो. उदा. ओला हरभरा, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यात त्याला टहाळ म्णतात. बीड जिल्ह्यात डहाळे आणि औरंगाबाद जिल्ह्यात बूट म्हणतात. चमकोश ही एक पालेभाजी आळू चमकोरा आणि पोथीची पाने या तीन नावांनी ती मराठवाड्यात ओळखली जाते. पती-पत्नीसाठी नवरा बायको हा शब्द रुढ आहे. तथापि गडी माणसं , यातील गडी हा पतीसाठी आणि माणसं पत्नीसाठी असे शब्द बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागात वापरले जातात.

औच्चारिक बदल हे मराठवाडी बोलीचे एक वैशिष्ट्य आहे. अवघड उच्चार सोपा करणे हा माणसाचा स्वभाव आहे. असा उच्चार शब्दारंभी अधिकचा स्वर येतो. उदा. अस्तुरी, अस्नान, कधी कधी शब्दाच्या मध्यभागी एखादा वर्ग येतो किंवा वर्गाचा लोपही होतो.

त्यामुळे त्या शब्दाला उच्चार सुलभ होतो. उदा. इंदर, चंदर, रगत, रतन अडाणी दुकाळ, नेम, कधी कधी उच्चारांच्या सुलभतेसाठी वर्गाची अदलाबदलीही होते. उदा. उरफाटे, गरबडश गरसोळी यावरून हे स्पष्ट होते. की, क्लिष्ट, जोडाक्षरयुक्त शब्द उच्चारण्यास कठीण असतात. त्यांचा उच्चार सोपा करण्यासाठी शब्दारंभी मध्यभागी स्वर किंवा वर्ण येतो आणि त्यामुळे उच्चार सोपा होतो.

**उच्चारसौंदर्य**

मराठवाडी बोलीत ण ऐवजी न येतो ही प्रक्रिया फार मोठ्या प्रमाणात झालेली दिसून येते या संदर्भात डॉ. ना.गो.नांदापूरकर यांनी केलेले विवेचन अतिश्य मोलाचे आहे. या संदर्भातील निवडक उदाहरणे पुढीलप्रमाणे पहाता येतील ती अशी आन, करनी, खन, घरानं, जेवन, पानी, फनी, लोनी, वरन, शाना, हरन ई.

मराठवाडी बोलीत श ऐवजी स आणि स ऐवजी श अशी प्रक्रियाही फार मोठ्या प्रमाणात झालेली दिसून येते या संदर्भातील उदाहरणे पुढील प्रमाणे आहेत ती अशी साकर, सूळ, सेज, शिरवा, आणि शिलंगण, शिव इ. तसेच य श्रुती आणि व श्रुतीची प्रक्रिया ही झालेली दिसून येते. उदा चयन, दयव, भयन, येल आणि गाव, दिवा पिवळा, मावली, इ. येथे आणखी एका वैशिष्ट्याचा उल्लेख केला पाहिजे. तो म्हणजे व्यंजनाच्या द्वित्तीकरण्याचा उदा. अस्सल, दाल्ला, नक्कल, वान्नेर इ.

मराठवाडी बोलीचा औच्चारिकदृष्ट्या विचार केल्यानंतर तिचा व्याकरणदृष्ट्या विचार करणे महत्वाचे ठरते. त्यात विभक्ती, अव्यये, काळ क्रियापदे, कृदन्ते, विशेषणे, इत्यादी याचा विचार अभिप्रंत आहे. मराठवाडी बोलीत विभक्ती, प्रत्यय लागण्यापुर्वी ई त्यांना अशी वेगळी सामान्यरुपये आढळून येतात उदा. ताईईचे, बाईईचे, बहेनाबाईईचे आणि करवल्याह्याचा, फडवाहयच्या, बडव्याहयच्या तसेच नामाची सामान्यरुपे न होता त्याला विभक्ती प्रत्यय लागलेले आढळून येतात. उदा. पालखीला, जिंतूरहून, बासरचा इ. शब्दयोगी साधीत विभक्तीचचा विचार करतांनाही मराठवाडी बोलीत वेगळी रुपये आढळून येतात उदा. देवापाशी, देवापसी, तुळशीपशे, तुळशीपसे, चाऱ्यासाठी आणि आऱ्हाड, पऱ्हाड, तसेच

नगरापासून, झाडाखाले, तारावऱ्ही झाडावऱ्हे, घरावरे, घरावरती, शहरामंदी, देवळामंदी, घरामव्हरं, घराम्होरं.

सर्वनाम विभक्तीची काही रुपेही वेगळी आढळून येतात. सर्वनाम विभक्तीचे प्रथमपुरुषी तृप्तीयेचे रुप म्या शितीयपुरुषी रुप त्या असे आढळते प्रथम पुरुष सर्वनामांची षष्टीची रुपे आहेत तर स्त्री बोली भाषेची रुपे मराठवाडी स्त्रीयांची भाषापुढील प्रमाणे आहेत.

आपल्या मनातील भाव व्यक्त करण्याचे भाषा हे एक महत्वाचे साधन आहे. लोकसमूहाच्या जगण्यातून भाषेला एक रुप प्राप्त होत असते. लोक ज्या भूप्रदेशावर राहतात. तेथीलच लोकसमूहाची परंपरा, लोकसमूहाची जात आणि धर्म यांचे संदर्भ स्वाभाविकपणे येत असतात. लोकसमूहाच्या या वैशिष्ट्यातूनच भाषेला एक वेगळेपणही प्राप्त होत असते. बोणाऱ्या लोकसमूहाच्या नावाने भाषा ओळखली जाण्यात गैरनाही. असे सुताराची भाषा, गवंड्याची भाषा, कुणब्याची भाषा, या प्रमाणेच स्त्रियांची भाषा असेही म्हणता येते. ही भाषा फक्त स्त्रियातच प्रचलित असते.

निसर्गानेच स्त्रियांना दिलेल्या एका वेगळेपणातून या वेगळेपणाने त्यांच्या वाट्याला आलेलया जगण्यातून, त्यांच्या भाषेतही एक वेगळेपणा आलेला प्रत्ययास येतो. जसे-न्हाण येणे, कावळा शिवणे, डोहाळे या सारखे शब्द स्त्रीचे शारिरीनिष्ठ अनुभव सांगणारे आहेत.

पारंपारिक पुरुषप्रधान समाज व्यवस्थेने स्त्रियांना चूल आणि मूल असे कार्यक्षेत्र ठरवून दिल्यामुळे पुरुषांच्या अनुभवापेक्षा स्त्रियांचे अनुभक्षेत्रही काहीसे वेगळे ठरते. त्यांच्या या अनुभवांच्या वेगळेपणातूनही त्यांच्या भाषेत एक वेगळेपण आलेले आहे. स्त्रियांचे म्हणून असलेले शारिरनिष्ठ अनुभव तसेच त्यांचे कार्यक्षेत्र स्त्री-जीवनातील विधी-विधाने परंपरा यातून त्यांच्या भाषेत एक वेगळेपणा आलेला आहे. स्त्रियांची प्रचलित असते. स्त्री-त्वाचा अनुभव हा त्यांच्या भाषेतील शब्दांचा एक महत्वाचा विशेष आहे. भाषेच्या या वेगळेपणामुळेच स्त्रियांची भाषा वेगळी बनलेली आहे. हे मराठवाड्याच्या ग्रामीण भागातील स्त्रियांच्या बोली भाषेतून पहावयास येते. अर्थात मराठवाड्याच्या बोलीशी स्त्रियांच्या या बोलीचे एक नाते आहेच. स्त्रियांच्या बोलीतील शब्द स्त्रियांचे स्त्री म्हणून आलेले अनुभव सांगणारे आहेत. पुरुषांच्या भाषेत हे शब्द प्रचलित नसतात. स्त्रियांच्या शरिरनिष्ठ अनुभवातून आणि त्यांच्या

स्वयंपाकघराशी असलेलया संबधातून त्यांच्या वाट्याला आलेल्या जगण्यातून भाषेत त्यांच्या काही खास शब्दांची मराठवाड्यातील स्त्रियांच्या बोलीतील काही शब्द येतात.

उदा - न्हाण येणे, पदर येणे, शहाणी होणे, नातू होणे, पालव येणे, वटी येणे, राघू बोलणे, कावळा शिवणे इत्यादी.

* स्त्रीच्या गरोदर अवस्थेचा निर्देश पुढील प्रमाणे स्त्रियात केला जातो. चोरुन खाणे, कावळा मुका होणे, दो जीवाची असणे, पाय जड होणे, निरी उंचावणे, पोटुशी असणे.

* आणि गोरदरपणाचा विधी सांगण्यासाठी - चोळी घालणे, डोळाळे लागणे, असे वाक्यप्रचार प्रचलित आहेत.

**स्त्रीच्या शरिरनिष्ठ अनुभवातून स्त्रीचे खास अनुभव सांगणारे शब्द.**

ओली बाळंतीण, बाळंतणीची न्हाणी, बाळंतणीचे पतपाणी, शेक देणे, पाचवी, नाळ कापणे, गुटी देणे, मध चाटविणे, बाळुते इत्यादी.

वांझपणा, बोळवण करणे, बांगडी वाढणे, पांढरे कपाळ भांगेत गुलाल, काकण ढिले होते. जोडवे वाजू न देता चालणे, पदर ढळणे, पदरात घेणे, पदर पसरणे, उष्टी हळद, वटी खोचणे, कंबळ, बाजिंदी, शिंदळ, छिनाल, चूडा, भंडवाडा, ढालगज, आवा लुटणे, संक्रांतीचे वाण, वाण देणे, सुगडे, पान्हा फुटणे, अंगावर पाजणे, अंगावरचे जाणे, नांदणे, ओटी भरणे, कुंकू लावणे, पाळणा हलणे, इत्यादी हे शब्द स्त्रीला स्त्री म्हणून येणारे अनुभव सांगणारे आहेत.

**स्त्रियांचे दैनंदिन कामाचे स्वरुप सांगणारे शब्द.**

न्हाऊ-माखू घालणे, वेणी-फणी करणे, सडा-सारवण, लिपणे-सारवणे, तुळशीला पाणी घालणे, धुणी-भांडी, चूल पेटविणे, निवडणे-टिपणे, जात्यावर बसणे, सटर-फटर, आंथरुण-पांघरुण घालणे, लवंडणे, बाळाला थापटणे, खाऊ पिऊ घालणे, आव भगत करणे, केर कचरा काढणे, गाडगी-मडकी लावणे, लुगड्याला दंड घालणे, वाळवण, तेल वात करणे.

**स्वयंपाक घरातून स्त्रियांच्या भाषेत आलेले शब्द.**

चुल पेटविणे, चुलीत लाकडे सरकविणे, दाळ शिजवणे, वल्हयावर भाजी ठेवणे, काठवट, पीठ मळणे, भाकरी थापणे, चून, कोल्ड्यास, सागुती, पाटा-वरवंटा, वाटण, घोळाणा, शेवया बोट्ळे, आकडी, निरस (न तापलेले दुध), सोजी, सपीट, आदण, इरजन लावणे, इसान इत्यादी शब्दाचा संबध स्वयंपाकाशी आहे.

**स्वयंपाक घरातील वस्तू, पदार्थ यांच्या गुणधर्मावर वापरल्या जाणाऱ्या प्रतिमा.**

साकर सोजी, मधाची घागर, घडीचा भाकर, पिठी साखर, गुळाचा खडा, खडीसाखर, पुरणपोळी, गुळाची पोळी, जिरे साळीचा भात, अंबाड्याची भाजी, निरशा दुधाचा खवा, दुधाची कळी, चुलीतला इंगूळ, येलदोडा, मिरचीचा ठेचा, आग जंजाळ कोल्ड्यास हे शब्द स्वयंपाकाच्या पदार्थाशी निगडीत आहेत.

**स्त्रियांची वेशभूषा- वस्त्रालंकार विषयक शब्द**

कुंकवाची चिरी, बुचडा, टोपपदरी लुगडं, इरकली, लुगडं, काळी चंद्रकला, चोळी, जरबुट्याची चोळी, खनाळं, कुंकवाच बगव, कुंची, अंगड-टोपड, गोठ-पाटल्या, पुतळ्याची माळ, मणी डोरलं, गळसरी, सरज्याची नथ, जोडवे, तोडे, मासोळी, बाजुबंद, चुडा, बांगडी, काकण इत्यादी.

**स्त्रियांच्या बोलीतील अन्य शब्द**

दीट, भानवस, रुखवत, सवाष्ण, भ्रतार, कंथ, बया, मालन, गडणी, शेजी, मावळण, नेणंता मुराळी, जिजी, वसा, वैराळ, सय, वक्ट, वंगाळ, इंद्रावण, चोखट अगुचर, नसानी, नौती, नेणंती, वजं वजं, सटी, अगुचर

मराठवाड्याच्या ग्रामीण भागातील स्त्रियांच्या दैनंदिन जीवनात या स्वरुपाचे शब्द नेहमी बोलले जातत. या शब्दांची निर्मिती आणि प्रचलन प्रामुख्याने स्त्रियातच होत असते. या शब्दांत स्त्री जीवनाचा अनुभव साठविलेला आहे. या शब्दात स्त्रीच्या शारिरीनिष्ठ अनुभवा बरोबरच, तिच्या वाट्याला आलेल्या जगण्यातील अनुभवांचेही संदर्भ आहेत. निसर्गतः स्त्रीचे असलेले वेगळेपण, पुरुष प्रधान संस्कृतीत तिला असलेले दुय्यमस्थान, स्त्रीकडे पाहण्याचा पारंपारिक दृष्टीकोण, सामाजिक परंपरा, तिची सुखदुःखे आणि जीवन जगण्याची तिची

तऱ्हा, तिच्या आवडी-निवडी असे अनेक संदर्भ मराठवाड्यातील स्त्रियांच्या बोलीत पाहवयास मिळतात.

शब्द, त्यांचा अर्थ, त्यातून व्यक्त होणारा स्त्री जीवन विषयक अनुभव, यातून स्त्रियांच्या बोलीचे एक वेगळेपण प्रत्यायास येते. स्त्रियांची ही खास बोलीभाषा त्यांच्या समूहापूरती मर्यादित असते.

स्त्रियांच्या भाषिक विनिमय त्यांचे गूज या भाषेतून होते. या भाषेतील शब्द स्त्रीत्व युक्त असतात. स्त्रियांचे म्हणून जे विशिष्ट अनुभव असतात ते सांगण्यासाठी या शब्दांची निर्मिती झालेली असते. या शब्दांना स्त्री जीवनाचे, स्त्री समूहाचे संदर्भ प्राप्त झालेले असतात स्त्री हा समाजाचाच एक घटक असल्याने स्त्रियांच्या या भाषेला, भाषेतील शब्दांना समाज भाषा विज्ञानाच्या दृष्टीनेही महत्व असतेच, स्त्रीला येणारे अनुभव, स्त्री जीवनातील आचार विचार, रुढी प्रथा, परंपरा, संकेत, स्त्रीच्या भाव भावना, स्त्रीने पाळावयाचे विधी निषेध, विधी विधाने आणि समाजव्यवस्था याचा अभ्यास मराठवाडीशी भाषेत समाज भाषा विज्ञानात महत्वाचा ठरतो.

मराठवाड्याच्या ग्रामीण भागातील स्त्रियांच्या बोली भाषेच्या अभ्यासातून सामाजिक सांस्कृतिक पार्श्वभूमीसह स्त्री जीवनाचे अनेक पैलू लक्षात येऊ शकतात. बोलणाऱ्या लोकसमूहाच्या विविध वैशिष्ट्यातूनच भाषेला रुप प्राप्त होत असते. हे लक्षात घेतले तर स्त्रियांच्या भाषेचे वेगळेपण आणि महत्व स्वरुप विशेष विचारात घेणे महत्वाचे आहे.

## संदर्भ ग्रंथ

१.सुलभ मराठी भाषाशास्त्र - प्र.न.जोशी.
२. मराठीचे ऐतिहासिक भाषाशास्त्र - र.रा.गोसावी
३. आधुनिक भाषा विज्ञान - डॉ.कल्याण काळे, डॉ.अंजली सोमण
४. मराठवाड्यातील संकलित लोकगिते डॉ.शरद व्यवहारे.
५. साठोत्तररी साहित्य प्रवाह - डॉ.प्रल्हाद लुलेकर
६. मराठीतील स्त्री आत्मचरित्रांचा सामाजिक अंगाने अभ्यासने-सौ.श्रुतीश्री वडगबाळकर